PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/35/ of 2020**

## परिपत्रक:

विषय:— विधानपरिषद तारंकित प्रश्न क्रमांक २५३.
श्री विक्रम काळे, वि. प. स. व इतर
वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याबाबतची माहिती तातडीने उलट टपाली पाठविण्याबाबत.

संदर्भ:— (१) शिक्षक संचालनालयाचे क्र. एनजीसी/वि.प.ता.क्र. २५३/मवि ३/ नाग/ १३०७४ दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजीचे पत्र.
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. विपका—२०२०/ (६०/२०)/ मशि—४ दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विधानपरिषद तारंकित प्रश्न २५३ अन्वये मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातंर्गत महाविद्यालयांच्या संदर्भात सदर पत्रासोबत जोडलेल्या प्रारूपात माहिती शासनास **तात्काळ** सादर करणे आवश्यक आहे. तद्अनुषंगाने आपल्या महाविद्यालयाशी निगडीत माहिती सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ, ब, क आणि ड** मध्ये माहिती भरून **तात्काळ विनाविलंब <u>ar.affiliation2@fort.mu.ac.in</u> या ईमेल पीडीएफ** मध्ये पाठविण्यात यावी.

सदर माहिती स्विकृत असल्याने सदर माहितीस प्रथम प्राधान्य देण्यात यावे. प्रस्तृत माहिती तात्काळ विनाविलंब पाठविण्यात यावी, याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत— संदर्भिय पत्रे व प्रपत्र अ, ब, क आणि ड

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
04 मार्च, २०२०

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

03/3/2020

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२१११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. एनजीसी/वि.प.ता.प्र.क्र.२५३/मवि३/नाग 13078 दिनांक : 28 FEB 2020

मंगळवार अतितात्काळ/ विधानमंडळ प्राधान्य

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

**विषय -** **विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २५३**
**श्री विक्रम काळे, वि.प.स. व इतर**
**वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याबाबत**

**संदर्भ -** शासन पत्र क्रमांक विपका - २०२०/(६०/२०)/मशि-४ दिनांक २४.२.२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित शासन पत्राची छायांकित प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन पत्रान्वये उपरोक्त विषयाचा तारांकित प्रश्न स्वीकृत करण्यात आला असून त्यामध्ये खालील उपप्रश्न उपस्थित करण्यात आले आहे.

2001.
24 NOV. 2001

१. राज्यात कायम विना अनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी व नंतर मान्यता देण्यात आलेल्या उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांची एकूण संख्या किती व त्यामध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे?
२. असल्यास, उक्त सर्व महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे?
३. असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?
४. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

उपरोक्त नमूद विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २५३ बाबतची प्रश्नोत्तरे स्वरुपातील माहिती व पूरक टिपणी तात्काळ विनाविलंब संचालनालयाच्या मेल mavi.dhepune@gov.in वर पाठविण्याता यावी. सदरचा प्रश्न स्विकृत असल्याने सदरच्या माहितीस प्रथम प्राधान्य देण्यात यावे. प्रस्तुत प्रश्नाचे उत्तर विहित वेळेत पाठविण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

27/02/2020

(प्रमिला मराठे)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

DR (A+) 03/03/2020

प्रत - कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२ यांना संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
2 6 FEB 2020
आवक क्रमांक:-
शाखा:-

**महाराष्ट्र शासन**

क्र. विपका-२०२०/(६०/२०)/मशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०२०.

प्रति,
संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषय: <u>विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. २५३</u>
**श्री. विक्रम काळे, वि.प.स. व इतर**
**वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबतचा तारांकित प्रश्न स्वीकृत करण्यात आलेला असून त्यामध्ये खालील उपप्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. :-

१) राज्यात कायम विनाअनुदान धोरण स्वीकारण्यापुर्वी व नंतर मान्यता देण्यात आलेल्या उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांची एकूण संख्या किर्ती व त्यामध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे,

२) असल्यास, उक्त सर्व महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे,

३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

उपरोक्त तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने आवश्यक तो अहवाल तात्काळ शासनास सादर करावा, हि विनंती.

(द. व. खारके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

## प्रपत्र अ

राज्यात कायम विना अनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी (२४.११.२००१ )मान्यता दिलेली अनुदानित महाविद्यालये

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेचे नांव | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेपैकी सुरु असलेली विद्याशाखा | कोणत्या तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. | अनुदान मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक | अनुदान मंजूर झालेल्या विद्याशाखेचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

स्वाक्षरी

विभागीय सहसंचालक(उच्च शिक्षण)

-------------- विभाग--------------

## प्रपत्र ब

राज्यात कायम विना अनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी (२४.११.२००१ )मान्यता दिलेली कायम विना अनुदानित महाविद्यालये

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेचे नांव | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेपैकी सुरु असलेली विद्याशाखा | कोणत्या तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

स्वाक्षरी

विभागीय सहसंचालक(उच्च शिक्षण)

------------- विभाग-------------

## प्रपत्र क

**राज्यात कायम विना अनुदान धोरण स्वीकारल्यानंतर (२४.११.२००१ )मान्यता दिलेली अनुदानित महाविद्यालये**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेचे नांव | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेपैकी सुरु असलेली विद्याशाखा | कोणत्या तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. | अनुदान मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक | अनुदान मंजूर झालेल्या विद्याशाखेचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

स्वाक्षरी

विभागीय सहसंचालक(उच्च शिक्षण)

-------------- विभाग--------------

## प्रपत्र ड

**राज्यात कायम विना अनुदान धोरण स्वीकारल्यानंतर (२४.११.२००१ )मान्यता दिलेली कायम विना अनुदानित महाविद्यालये**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेचे नांव | मंजूरी दिलेल्या विद्याशाखेपैकी सुरु असलेली विद्याशाखा | कोणत्या तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

स्वाक्षरी

विभागीय सहसंचालक(उच्च शिक्षण)

-------------- विभाग--------------